# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.

(02554) 231800, 231801, 232807 फॅक्स :- 230894.

Email Id :- malegaon_corporation01@yahoo.com आयुक्त कार्यालय :- 231900


**श्री. नवकार डेव्हलपर्स भागीदार दक्षा मेगराज गोलेच्छा व इतर , व्दारा/- रितेश कांकरिया, आर्किटेक्ट,मालेगावयांचा संगमेश्वर वॉर्डातील फायनल प्लॉ.नं. ७८ (पैकी ) सि.स.नं. ११०१ या जमिनीचा सुधारीत सिमांकित (Demarcated) अभिन्यास मंजुर करणे बाबत दिनांक १२/०८/२०२० चा अर्ज.**

---,,---

हुकूम

नगर रचना जा.क्रं. 93 /२१

तारीख : 24/08/२०२१

**श्री. नवकार डेव्हलपर्स भागीदार दक्षा मेगराज गोलेच्छा व इतर , व्दारा/- रितेश कांकरिया, आर्किटेक्ट,मालेगाव यांचा संगमेश्वर वॉर्डातील फायनल प्लॉ.नं. ७८ (पैकी ) सि.स.नं. ११०१ या जमिनीचा सिमांकित (Demarcated) अभिन्यास** लाल रंगाने दुरुस्त केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये मंजुर करण्यांत येत आहे. मात्र खालील शर्ती विभाजन केलेल्या प्लॉटस् वर बंधनकारक राहतील.

**<u>शर्ती</u>**

1. अभिन्यासातील सर्व भुखंडाचा वापर रहिवासी कारणासाठीच करावा.
2. अभिन्यासातील कोणत्याही भुखंडाचे विभाजन पुर्व परवानगी शिवाय करण्यांत येवू नये.
3. अभिन्यासातील भुखंड,रस्ते,खुल्या जागा यांची प्रत्यक्ष जागेवर प्रस्तावित अभिन्यासा प्रमाणे आखणी सिटी सर्व्हे ऑफिसर/तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख यांचे मार्फत करुन तसा दाखला व नकाशा म.सहा. संचालक, नगर रचना,नाशिक यांचे कार्यालयात महानगर पालिके मार्फत पाठवावा.
4. ले-आऊट मध्ये महानगरपालिकेने दिलेल्या स्पेशिफिकेशन नुसार रस्ते,गटारी,विद्युत पोल ची कामे केल्या शिवाय ले-आऊटला अंतीम मान्यता मिळणार नाही.
5. अभिन्यासातील प्रस्तावित खुल्या जागेवर कोणतेही बांधकाम अनुज्ञेय होणार नाही. ही जागा भुखंड धारकांच्या उपयोगासाठी मोकळी ठेवावी लागेल. तसेच ही खुली जागा परवानगी दिल्या तारखे पासुन एक महिन्याचे आंत नाममात्र रु. १/- किंमतीस महानगरपालिकेच्या ताब्यांत द्यावी लागेल.
6. अभिन्यासातील रस्ते व गटारी महानगरपालिकेच्या ताब्यांत द्यावी लागेल.
7. बांधकाम करतांना अभिन्यासांतील भुखंडात पुढून, मागुन व बाजुने सोडावयाचे अंतर एकुण बांधकामाचे क्षेत्र व मजल्यांची संख्या हया बाबत विकास नियंत्रण नियमावलीनुसार राहतील व नियोजन प्राधिकरणाची म्हणजेच म.न.पा. नियोजन प्राधिकरणाची पुर्व मंजुरी घेतल्या शिवाय बांधकाम करु नये.
8. सदरच्या रेखांकनास अंतीम मंजुरी घेतल्या नंतर महसुल खात्या कडून अकृषिकपरवानगी घेणे आवश्यक आहे.
9. सदरच्या रेखांकनातील परवानगी व अट क्रमांक ३ व ४ ची पुर्तता झाल्या खेरीज रेखांकनातील भुखंडाची विक्री व हस्तांतरण करता येणार नाही.
10. अभिन्यासातील प्रत्येक भुखंडाचे क्षेत्र प्रत्यक्ष जागेवर विकास नियंत्रण नियमावलीतील अनुज्ञेय क्षेत्रा प्रमाणे असावे. तसेच राज्य हमरस्ता, राष्ट्रीय महामार्ग व जिल्हा प्रमुख मार्गावर व १८.०० मी. रुंदी अथवा त्यापेक्षा जास्त रुंदीचे रस्त्यावरील भुखंडाचे क्षेत्र हे ४५० चौ.मी.पेक्षा कमी अनुज्ञेय होणार नाही.
11. वरील पुर्तते व्यतिरिक्त अभिन्यासास परवानगी दिल्या तारखे पासुन एक वर्षाचे आंत अर्जदाराने खालील बाबींची पुर्तता करावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

अ. जमीन उंच सखळ असल्यास ती योग्य प्रकारे समपातळीवर आणणे.

ब. नियोजित रस्त्यात नाले, ओहोळ इ.असल्यास त्यावर सार्वजनिक वापर रस्त्यासाठी पुल बांधणे.

क. विजेचे अथवा दूरध्वनी स्तंभ भुखंडात अथवा रस्त्यात येत असल्यास संबंधित खात्याकडे आवश्यक तो खर्च भरुन त्याची फेर आखणी करुन रस्त्याच्या एका बाजुला घेणे.

ड. अभिन्यासा खालील जागेत पाणी पुरवठयाची सोय उपलब्ध करुन देणे.

इ. मंजुरी प्राधिकरणाने निर्देशित केलेली अभिन्यासा खालील संबंधित विशिष्ट कामे पुर्ण करणे.

12. राष्ट्रीय/राज्य महामार्गाची व इतर वर्गीकृत रस्त्याची नकाशावर दाखविलेली रुंदी व प्रस्तावित वापरासाठी बांधकाम रेषा किती अंतरावर घ्यावी याबाबत संबंधित प्राधिकरणाकडून परवानगी घेणे आवश्यक आहे.

13. सदर अभिन्यासातील खुल्या अथवा अन्य जागेत झाडे अस्तित्वात असल्यास ती विना परवानगी तोडण्यांत येवू नये.

14. वरील पैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास अभिन्यास प्लॅनची मंजुरी रद्द करण्यांत येईल.

15. सदरच्या रेखांकनात सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास/असल्यास सदरची मंजुरी रद्द करणेत येईल.जमीन विकास शुल्क संपुर्ण रक्कम रु. 8,92,917/- भरण्यांत आलेली आहे.

06 दि.05/12/2012

आयुक्त,
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

प्रत माहितीसाठी सादर....

1. श्री. नवकार डेव्हलपर्स भागीदार दक्षा मेगराज गोलेच्छा व इतर , व्दारा/- रितेश कांकरिया, आर्किटेक्ट,मालेगाव
2. मा.जिल्हाधिकारी,नाशिक
3. मा.सहा.संचालक,नगर रचना,नाशिक शाखा,नाशिक.
4. म.तालुका निरिक्षक,भुमि अभिलेख,मालेगाव.
5. तलाठी, मालेगाव संगमेश्वर कार्यालय, मालेगाव.

Layout-1,2